# ६ छत्रपति शिवाजी पोवाडा



(या पोवाड्यांत कांहीं भाग स्वकृत तर कांहीं राष्ट्रशाहीर कै. म. ना. नानिवडेकर ह्यांच्या छ. शिवाजीचरित्र पोवाड्यांतील आहे. 'फटका' (चंद्रकांत चालीतील भाग माझ्या बंधूंच्या गुरुवर्यांचा)

(चाल - चंद्रकांत)

स्वातंत्र्याचा शाहिर आतां डफ कड्कड घुमवी।
छत्रपतींचा गाई पवाडा, शांत बसा विनवी॥
मृतप्राय राष्ट्रास जयानें संजीवनी दिधली।
स्वातंत्र्याचा मंत्र पढवुनी जनता जागविली॥
बृहस्पतीही थकेल करतां गुणवर्णन ज्याचें।
गुणाब्धिमंथनीं सरस्वतीच्या शक्ति पुरे नाचे॥

(चाल) छत्रपति शिवाजी रणशूर। घेऊनी तलवार। मोंगल जर्जर। करून राखिला हिंदुधर्मास॥ स्थापियली स्वतंत्रता देशास। उद्धरिलें हिंदु महाराष्ट्रास॥

(चाल - चंद्रकांत)

गुलामगिरीच्या कर्दमांत रुतली भारत भू अपुली।
उद्धराया तिला धांवले शिवप्रभु वाली॥
यवना बुडवुनी, स्वराज्य मिळवुनी राखला धर्म।
छत्रपतींच्या अवतारांचें (आयुष्याचें) हेंच असे मर्म॥
मंदिर महिला मानबिंदु हे असती राष्ट्राचे।
जतन कराया त्यांचें नाचे खड्ग शिवाजीचें॥
स्वराज्याचा घुमवुनी मंत्र।
यवनांवर धरलें शस्त्र।
मिळविलें देश-स्वातंत्र्य।

मेरी जागृती राष्ट्रामाजीं (देशामध्यें) स्वत्वरक्षणाला।
उच्च स्वरानें छत्रपतींचा जय हो जय बोला॥ ३७

(चाल) स्वातंत्र्य पूर्ण मिळवून। शिवाजी विनयानं। करी वंदन। जिजाऊ मातेच्या हो चरणांस॥ अश्रूंच्या धारा त्यांच्या नेत्रांस। ध्यानी धरा सत्य इतिहास॥

स्वातंत्र्यवीर शोभला। भारतीं भला। तोड नाहीं ज्याला। रक्षी जो देशदेशधर्मासि॥ श्रीदि गोब्राह्मण पालक खास। झळकला हिरा महाराष्ट्रास॥

परस्त्रीसि मानितो माता। भावकृपिता। धर्मनिष्ठ शांतां। शरीर-संपदा देशकार्यासि॥ सज्ज होशास धडा देण्यास। झळकला हिरा महाराष्ट्रास॥

शिवाजी तो शिवाजीच खरा कोहिनूर हिरा। झळकत तुरा। मराठी जरिपटका मुलुखांस॥ डंका गर्जला पारी खंडास। झळकला हिरा महाराष्ट्रास॥

दर्यांत दुर्ग बांधिले। कोट उभविले। खड्ग फिरविले। क्षणामाधि केला रिपूंचा नाश॥ महादेव गातो त्याच्या कवनास। झळकला हिरा महाराष्ट्रास॥

श्रोत्यांनो पोवाडा ऐकुनी। जाल परतुनी। मर्म ध्या ध्यानी। क्षात्रतेजाच्या धरा ध्यास॥ नमुं या शिवाजी आजि समयास। झळकला हिरा महाराष्ट्रास॥

—x—

मुम्बई
रचना २३.४.१९६)

(दि. २५.४.१९६१ ला रात्री शास्त्री हॉल, ग्रँट रोड मुम्बई ७ येथे हा पोवाडा गायिला.)